# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र.पीयूबी-१०००/प्र.क्र.७३ /२०००/३४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १ मे, २००१

५-इ) 'अ','ब' व 'क' वर्ग वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती अनुक्रमे मुख्यालय, विभागीय माहिती उपसंचालक व जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत वितरित होतील. सर्व शासकीय कार्यालयांनी त्या त्या स्तरावर प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती प्रसिद्ध दिनांकापूर्वीच किमान दहा दिवस आधी संबंधित अधिकाऱ्याकडे पाठविणे बंधनकारक राहील. वृत्तपत्रनिहाय प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीची मूल्य मर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | एका कामाचे मूल्य | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार | जाहिरात प्रसिद्धीचे वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु. २० लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | जिल्हा माहिती अधिकारी | एक 'क' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु. २० लाखाच्यावर ते ५५ लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | विभागीय माहिती उपसंचालक | एक 'ब' वर्ग दैनिक व एक 'ब' किंवा 'क' वर्ग साप्ताहिक |
| ३ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रुपये ५५ लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात | मुख्यालय | १) संबंधित विभागातील 'अ' वर्ग दैनिकास व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एक 'क' वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे सें.मी.चे प्रमाण लक्षात घेऊन जाहिरातींचे वितरण करण्यात येईल.<br><br>२) 'अ' वर्ग दैनिकांबरोबरच संबंधित विभागातील 'अ' वर्गातील साप्ताहिकांना त्यांच्या प्रसिद्धीचा दिनांक व वार विचारात घेऊन वर्गीकृत जाहिरात वितरित करण्यात याव्यात. त्या-त्या विभागातील 'अ' वर्ग दैनिकांच्या रोटेशनमध्ये शेवटच्या क्रमांकावर 'अ' वर्ग साप्ताहिकांचा समावेश करुन जाहिराती देण्यात येतील. अशी प्रसंगी त्या जाहिरातीसाठी पुरेसा अवधी ठेवण्यात आला आहे, याची खात्री करुन घेण्यात येईल. |

(सुधारणा : क्र. जाहिरात २००८/७३८/प्र.क्र.८०/३४ दिनांक १३ ऑगस्ट २००८ नुसार)

५-ई) इतर प्रकारच्या जाहिराती संबंधित विभागाने सुचविलेल्या वर्गाना प्राधान्य देऊन वितरित करण्यात याव्यात. या जाहिरातींच्या वितरणाचे अधिकार त्या त्या विभागातील विभागीय उपसंचालक यांना राहतील.

६) दिनांक १ मे, २००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र.६ अन्वये शासनाची विविध मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगर परिषदा, शासन पुरस्कृत सहाकरी संस्था, आदि स्वायत्त संस्थांना वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणानुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी अंमलबजावणी प्रक्रिया व नियमावली निश्चित करुन दिलेली आहे. तथापी सदर मंडळ, महामंडळे, स्वायत्त संस्था त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहीराती देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करित नाहीत असे निदर्शनास आले आहे. म्हणून पुन्हा निर्देश देण्यात येत आहेत की, मंडळ, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादी स्वायत्त संस्था यांनी त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देताना शासकीय धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्यांनी त्यांच्या जाहिराती शासनाच्या जाहिरात वितरण धोरणानुसारच देण्यात आल्या असल्याबाबत संबंधितांसमोर स्पष्ट करावे. (सुधारणा : सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. जाहिरात २००९/प्र.क्र.१३७/का-३४ दिनांक ३१ ऑगस्ट २००९ नुसार)

१२-अ) प्रकाशनातील नियमितपणा :
शासनाच्या प्रशासकीय कार्यात सुलभता यावी यासाठी दैनिके व साप्ताहिके यांच्याबाबतीत प्रचलित असलेले 'राज्यस्तर, विभागस्तर व जिल्हास्तर' हे नामाभियान रद्द करण्यात येऊन फक्त 'अ' वर्ग वृत्तपत्रे 'ब' वर्ग वृत्तपत्रे, 'क' वर्ग वृत्तपत्रे असे नामभिधान निश्चित करण्यात येत आहे.